**पाहिजेत**
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३२५ ■ गुरूवार, दि. २७ मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -325 ■ Thursday, 27 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

# विरोधकांच्या डोक्यात ‘कबर आणि कामरा’; अधिवेशन संपल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीसांचा टोला

## अधिवेशनानंतर मुख्यमंत्र्यांची पत्रकार परिषद; सरकारच्या कामाचा दिला आढावा

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

विरोधकांच्या डोक्यात फक्त ‘कबर आणि कामरा’ आहे, पण आमच्यासाठी महाराष्ट्रातील १३ कोटी जनता महत्त्वाची आहे, असे स्पष्ट मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या समारोपानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी सरकारच्या कामाचा आढावा घेतला आणि विरोधकांवर टीकास्त्र सोडले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आम्ही महाराष्ट्राच्या जनतेच्या हिताचे निर्णय घेतले. माथाडी सुधारणा विधेयक आणले, शेतकरी आणि कामगारांसंदर्भात महत्त्वाच्या चर्चा केल्या. जिथे सहा तास काम अपेक्षित असते, तिथे आम्ही रोज नऊ तास सभागृह चालवले. मोठे बहुमत असूनही आम्ही कोणतीही चर्चा टाळली नाही. आमचे सरकार हे केवळ घोषणाबाजी करणारे नव्हे, तर काम करणारे आहे. या पत्रकार परिषदेला मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. मात्र, अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार गैरहजर होते.



### अधिवेशनातील प्रमुख निर्णय आणि कायदे

- १२ महत्त्वाचे कायदे मंजूर झाले.
- माथाडी कामगार कायद्यात सुधारणा
- बनावट माथाडी कामगार ओळखण्यास मदत होणार.
- विनियोजन विधेयक मंजूर - सरकारच्या खर्चासंदर्भात महत्त्वाचा निर्णय.
- सर्व प्रश्नांना मंत्र्यांनी उत्तर दिली
- फक्त एका दिवशी मंत्र्यांना सभागृहात पोहोचण्यास उशीर झाला, त्यामुळे २० मिनिटांचा वेळ वाया गेला.



### धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर मुख्यमंत्रींचे स्पष्टीकरण

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर भाष्य करताना मुख्यमंत्री म्हणाले, ङ्गआम्ही ना नरम आहोत, ना गरम; आम्ही कायद्याने चालणारे आहोत. कायद्याने जे योग्य तेच केले आहे.

### अधिवेशनात लक्षवेधी सूचना वाढल्या, पण:

अधिवेशनात लक्षवेधी सूचना मोठ्या प्रमाणावर वाढल्या, मात्र यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यात काही हरकत नाही, पण अध्यक्ष आणि सभापतींना विनंती आहे की निकषात बसणाऱ्या लक्षवेधी सूचना घेतल्या पाहिजेत. अधिवेशन संपले असले, तरी सरकारने घेतलेल्या निर्णयांची आणि विरोधकांच्या भूमिकेची चर्चा आता राजकीय वतुर्ळात सुरू राहणार आहे.

### विरोधी पक्षनेते निवडीचा मुद्दा ‘अध्यक्षांच्या कोर्टात’

विरोधी पक्षनेता अद्याप निश्चित का झाला नाही, याबाबत विचारलेल्या प्रश्नावर मुख्यमंत्री म्हणाले, हा अधिकार आमचा नाही, तो विधीमंडळ अध्यक्षांचा आहे. अध्यक्ष स्वतंत्र आहेत, ते निर्णय घेतील. त्यांनी उद्या निर्णय घेतला तरी आम्हाला हरकत नाही.

# कामरा आणि अंधारेंविरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

स्टडअप कॉमेडियन कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक कविता सादर केली होती. तिच कविता, त्याच चालीत, ठाकरे गटाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी माध्यमांशी बोलताना बोलून दाखवली होती. याचे पडसाद आज विधानपरिषदेच्या सभागृहात उमटले. भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी कामरा आणि अंधारे यांच्याविरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल केला.

आमदार प्रविण दरेकर म्हणाले कि, हा एक प्रकारे सभागृहाचा किंबहुना सभागृहातील सगळ्या सदस्यांचा अवमान आहे. त्यांनी एकप्रकारे सभागृहातील सदस्यांना डिवचण्याचा प्रयत्न केलाय, ही बाब अत्यंत गंभीर आहे. हे सभागृह सर्वोच्च आहे आणि या सभागृहाचा अवमान आम्ही सहन करणार नाही. शिवसेना उबाठा गटाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी कामरा यांचा स्टुडिओ फोडल्याप्रकरणी यूट्यूब, सोशल मीडियाच्या माध्यमातून भाष्य करताना चुकीची भाषा वापरली होती. त्यांनी आपल्या निवेदनात संस्कृती आणि शाब्दिक मर्यादांचे उघडपणे उल्लंघन केलेय. आपण राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांविषयी बोलत आहोत, याचे भानही त्यांनी ठेवले नाही.

तथाकथित प्रसिद्धीसाठी उपमुख्यमंत्री पदावर असलेल्या व एका राजकीय पक्षाच्या प्रमुखाविषयी सोशल मीडियाच्या माध्यमातून अशा प्रकारे भाष्य करणे नैतिक मूल्यांचे अवमुल्यन आहे.

अंधारे यांनी बोलताना वापरलेली खालच्या पातळीवरील भाषा आणि कुणाल कामराने हेतूपूरस्पर उपमुख्यमंत्री यांच्यावर वैयक्तिक व उपरोधिक केलेले गाणे यातील भाषा एकप्रकारे सभागृहाचा अवमान करणारी आहे. त्यामुळे कुणाल कामरा आणि सुषमा अंधारे यांच्याविरोधात हक्कभंग मांडण्यास अनुमती द्यावी, अशी विनंती दरेकरांनी केली. त्यावर सभापती राम शिंदे यांनी हे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे योग्य त्या कारवाईसाठी पाठवीत असल्याचे जाहीर केले.

# धक्कादायक! धावत्या रेल्वेमध्ये टीसीकडून तरुणीचा विनयभंग

मनमाड : पुणे शिवशाही बस मधील तरुणीवर झालेल्या अत्याचाराची बातमी ताजी असताना महत्त्वाची बातमी समोर आली आहे. सध्या रेल्वे असो,एसटी बस स्टॅन्ड असो अथवा सार्वजनिक ठिकाण कुठेच महिला,मुलीवर सुरक्षित नाही बहुतांश ठिकाणी महिलावर अन्याय अत्याचाराच्या घटना सुरूच असून अशीच एक धक्कादायक घटना गोरखपूर-बंगळुरू या विशेष धावत्या रेल्वे गाडीत भुसावळ-मनमाड दरम्यान घडली.गाडीतील तिकीट तपासणाऱ्या टीसीने एका तरुणीचा विनय भंग करण्याचा प्रयत्न केला असून घाबरलेल्या या तरुणीने अक्षरशः डब्यातील शौचालयात स्वतःला कोंडून घेत टीसी पासून आपली अब्रू वाचवली आहे.या प्रकरणी रेल्वे पोलिसांनी टीसीवर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

मिळालेल्या माहिती नुसार सुमारे २२ वर्षाची तरुणी गोरखपूर-बंगळुरू विशेष प्रवासी रेल्वे गाडीने कानपूरहून पुण्याला जाण्यासाठी प्रवास करीत होती.तिच्याकडे कन्फर्म रिजेर्वेशन तिकीट नव्हते तीचे तिकीट आरएसी असल्याने तीने गाडीत असलेल्या तिवारी नावाच्या टीसीकडे सीट उपलब्धते बाबत विचारणा केली असता त्याने तिला गाडीतील बी-४ कोचमध्ये बसण्यास सांगितले मात्र त्या डब्यात जागा रिकामी नसल्याने या टीसीने या तरुणीला ए-१ कोचमधील ५ नंबर सीट दिली असता ही तरुणी त्या सीटवर जाऊन बसली काही वेळा नंतर तिवारी या तरुणीकडे आला आणि तिच्या सीटवर येऊन बसला आणि तिच्यासोबत गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला. पहिल्यांदा झालेला प्रकार कदाचित नजरचुकीमुळे झाला असावा असा समज या तरुणीचा झाला मात्र तिवारीने दोन ते तीन वेळा असाच प्रकार करण्याचा प्रयत्न केल्यामुळे सदर तरुणी प्रचंड घाबरली आणि डब्यातील शौचालयात कोंडून घेत तेथून तीच्या वडिलांना फोन केला आणि तीच्या सोबत टीसी तिवारीने केलेल्या गैरवर्तानाची माहिती दिली. त्यांनी रेल्वे पोलीस कंट्रोलरूमशी संपर्क साधला आणि मुलगी, गाडी याची सर्व माहिती दिली.

तो पर्यंत गाडी मनमाडला पोहचणार होती.कंट्रोल रूम मधून मॅसेज मिळताच रेल्वे पोलिसांनी प्लॉट फर्मवर धाव घेऊन गाडी येताच तिवारीला ताब्यात घेतले सदर तरुणी देखील मनमाडला उतरली आणि तिने टीसी तिवारी विरुद्ध फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी तिवारी विरुद्ध गुन्हा दाखल केला.

# अपयश झाकण्यासाठी धार्मिक विवाद; विरोधी पक्षनेत्यांचा राज्य सरकारवर हल्ला

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे बुधवारी सूप वाजले. परंतु राज्याला कबरीपासून कामरापर्यंत नेणारे हे अधिवेशन होते. या पलिकडे अधिवेशनात काहीही झाले नाही, अशी बोचरी टीका राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी केली. राज्यासमोर महागाई, बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या, असे अनेक गंभीर प्रश्न असताना सरकारने आपले अपयश झाकण्यासाठी राज्यात धार्मिक विविद निर्माण केला, असा आरोप काँग्रेसचे नेते आमदार नाना पटोले यांनी सरकारवर केला. हे सरकार बेलगाम असून उन्मत हत्तीप्रमाणे आहे. सरकारच्या डोक्यात हवा गेली, अशी टीका शिवसेना (ठाकरे) नेते भास्कर जाधव यांनी केली.

१६ दिवस चाललेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या काम काजावर विरोधकांनी टीकेची झोड उठवली. सत्तापक्षाच्या आमदार, मंत्र्यांनी तीन वेळा सभागृह बंद पाडण्याची राज्यातील पहिलीच घटना घडली. प्रश्नांची वस्तुस्थिती लपवण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हात दुसरा कोणी धरू शकत नाही. राजकीय भाषणासाठी जागतिक पातळीवर पुरस्कार देण्याची पद्धत असती तर फडणवीस यांच्या भाषणांना हा पुरस्कार मिळाला असता, अशी उपरोधिक टीका नाना पटोले यांनी केली.

सभागृहात संविधानाच्या गप्पा मारायच्या आणि त्याच संविधानाचा गाभा असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेली अनेक वर्षे घ्यायच्या नाहीत, हे फक्त भाजपा सरकारला जमणारे आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी देण्यात आलेले एकही आश्वासन या सरकारने पूर्ण केलेले नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि लाडक्या बहिणींना सहाशे रुपयांची वाढ न दिल्याने त्यांना फसवण्यात आले आहे. दावोसमधून कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक आणली गेली, मग राज्यात बेरोजगारी का वाढली. उद्योग विभागाने या गुंतवणुकीची श्वेतपत्रिका का काढली नाही, असा सवालही पटोले यांनी केला.

# बेकायदेशीर वृक्षतोडीवर एक लाखांचा दंड - सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

मोठ्या प्रमाणातील वृक्षतोड मनुष्य हत्येहून अधिक घात आहे. त्यामुळे पर्यावरणाची हानी करणाऱ्यांवर दया दाखवू नये. बेकायदेशीरपणे कापलेल्या प्रत्येक झाडासाठी एक लाख रुपये दंड आकारण्यास सर्वोच्च न्यायलयाने मान्यता दिली. तसेच अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय बेकायदेशीरपणे झाडे तोडणाऱ्यांवर कडक कारवाई केली पाहिजे असे सुप्रीम कोर्टाने सांगितले.

संरक्षित ताज ट्रॅपेझियम झोनमध्ये ४५४ झाडे तोडणाऱ्या व्यक्तीची दंडाविरुद्धची याचिका न्या. अभय ओक आणि न्या. उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने फेटाळून लावली. गेल्या वर्षी शिवशंकर अग्रवाल यांनी तोडलेल्या ४५४ झाडांसाठी प्रति झाड एक लाख रुपये याप्रमाणे एकूण ४ कोटी ५४ लाख रुपये दंड ठोठावण्यात आला होता, यासंबंधीचा केंद्रीय सक्षम समितीचा (सीईसी) अहवाल न्यायालयाने स्वीकारला. अग्रवाल यांच्यातर्फे युक्तीवाद करणारे ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी न्यायालयाला सांगितले की त्यांच्या अशिलाने आपली चूक मान्य केली आहे आणि माफी मागितली आहे.

वकिलांनी न्यायालयाला दंडाची रक्कम कमी करण्याची विनंती केली. ते म्हणाले की, अग्रवाल यांना केवळ त्या जमिनीवरच नव्हे तर जवळपासच्या ठिकाणीही झाडे लावण्याची परवानगी देण्यात यावी. न्यायालयाने दंडाची रक्कम कमी करण्यास नकार दिला. जवळपासच्या भागात झाडे लावण्याची परवानगी देण्यात आली.

# छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात अनधिकृत भूखंड, बांधकाम नियमित होणार

## - महानगर आयुक्त तथा विभागीय आयुक्त दिलीप गावडे

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात अनाधिकृत भूखंड तसेच बांधकामाबाबत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मदतीने सर्वेक्षण करण्यात येणार आहे. महानगर क्षेत्रात सर्वे क्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी यापूर्वी केले होते आता तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच संबंधित अधिकारी तसेच कर्मचारी यांनी सर्वेक्षण पथकास आवश्यक सहकार्य करण्याबाबत सूचना आज दिल्या.

विभागीय आयुक्त कार्यालयात आज छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील विना परवानगी भूखंड तसेच बांधकाम सर्वे क्षणाबाबत श्री. गावडे यांनी आज प्राधिकरण क्षेत्रातील तहसीलदार, गटविकास अधिकारी, उप अधीक्षक भूमी अभिलेख, दुय्यम निबंधक, गुंठेवारी कक्ष प्रमुख (म.न.पा.), व सबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधला, यावेळी महानगर नियोजनकार हर्षल बावीस्कर, सह महानगर नियोजनकार रविंद्र जायभाये, अनधिकृत बांधकाम विभाग प्रमुख सुनंदा पारवे, उप महानगर नियोजनकार यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

महानगर आयुक्त श्री.गावडे म्हणाले, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात अनाधिकृत भूखंड व विनापरवाना बांधकामाबाबत सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वे क्षणाच्या अनुषंगाने महसूल विभाग तसेच पंचायत विभागाने नागरिकांमध्ये जनजागृतीच्या अनुषंगाने लोकसंपर्कातील संबंधीत कर्मचारी जसे की तलाठी, ग्राम सेवक यांना सूचना देण्याबाबत सांगितले. तसेच सर्वेक्षण करताना आवश्यक कागदपत्रे सर्वेक्षकांना पुरविण्यात यावे, असे निर्देश दिले.

प्राधिकरण क्षेत्रामध्ये गुंठेवारी नियमांतर्गत छोट्या क्षेत्राचे भूखंड तसेच बांधकामे नियमित करण्याच्या अनुषंगाने संबंधित भूमी अभिलेख विभागाने मोजणी करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त श्री गावडे यांनी दिल्या आहेत. मोठ्या क्षेत्राच्या भूखंडामध्ये विनापरवावगी बांधकामे असल्यास त्याचे नियमितीकरण करण्याची प्रक्रिया सुरू असल्याने त्याबाबतची मोजणी करण्याच्या सूचनही त्यांनी दिल्या. निबंधक कार्यालयांनी लोकहितास्तव आवश्यक त्या परवानग्या पाहून दस्ताच्या कार्यवाहीबाबत आवश्यक निर्णय घेण्याबाबत त्यांनी निर्देश दिले.

अनधिकृत भूखंड तसेच बांधकाम नियमित झाले तर गरजूंना या मालमत्तेवर बँकेकडून कर्ज मिळणेही सुलभ होणार आहे. तसेच ज्यांना सदर मालमत्तेची विक्री करावयाची असल्यास विक्री करणेही सुलभ होईल. तसेच नियमित झालेल्या मालमत्तांचे मुल्यामध्ये वाढ होण्याची शक्यता असल्याने याबाबत जनजागृती करण्याबाबत महानगर आयुक्त श्री. गावडे यांनी सांगितले आहे.

# रोख रक्कमेचे घबाड; माय लॉर्ड, संशयाच्या भोवऱ्यात

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्या. यशवंत वर्मा यांच्या दिल्लीतील तुघलघ रोड, ३० क्रीसेंट या निवासस्थानी होळीच्या दिवशी म्हणजेच १४ मार्च रोजी रात्री लागलेल्या आगीत पाचशे रुपयांच्या नोटांची पुडकी जळलेल्या अवस्थेत मिळाली आणि हे वृत्त वेगाने पसरताच सर्व देशभर मोठी खळबळ उडाली. न्यायमूर्तींच्या घरी लागलेल्या आगीत पंधरा कोटी रुपये मिळाले अशाही बातम्या सुरुवातीला झळकल्या. आगीत जळलेल्या एकूण नोटांची किती रक्कम होती, पाच कोटी, पंधरा कोटी की पन्नास कोटी हा जरी वादाचा मुद्दा असला तरी न्यायमूर्तींच्या अधिकृत निवासस्थानी एवढी मोठी रक्कम कशी सापडली, कोणी दिली, कोणत्या कामासाठी दिली असे अनेक प्रश्न त्यातून उपस्थित झाले. न्या. वर्मा यांनी आजवर दिलेल्या काही निर्णयांची जंत्रीही माध्यमातून प्रसिध्द झाली. न्या. वर्मा यांनी या सर्व प्रकरणात तो मी नव्हेच अशी भूमिका घेतली आहे व आगीत जळालेल्या नोटांचा आपला काहीही संबंध नाही असा खुलासा केला आहे. आपण दिल्लीत नव्हतो, तर त्यादिवशी आपण पत्नीसह मध्य प्रदेशात भोपाळला होतो. आपल्याला बदनाम करण्यासाठी कोणी तरी हे घडवले असावे असेही न्या. वर्मा यांनी म्हटले आहे.

केंद्रात व राज्यात कोणाचीही सत्ता असली तरी सरकार आणि विरोधी पक्षांचे आरोप-प्रत्यारोप सतत चालूच असतात. विरोधी पक्ष सत्ताधाऱ्यांवर आरोप करीत असतो आणि सत्ताधारी विरोधकांवर सरकारी यंत्रणांचा वापर करून त्यांना काबूत ठेवत असतो. जेव्हा सर्वसामान्य जनतेला आरोप-प्रत्यारोपांच्या राजकारणाचा उबग येतो तेव्हा न्यायव्यवस्था हाच आपला आधार वाटतो. गलिच्छ राजकारणाच्या खेळात जनतेचा न्यायव्यस्थेवर विश्वास असतो. पण या विश्वासालाच न्यायाधीशांवरील आरोपांमुळे तडा गेला, तर जनतेने विश्वास ठेवायचा तरी कुणावर? न्या. यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी आगीत जळालेले पंधरा कोटी रोख रक्कमेचे घबाड मिळाले, ही घटना मन सुन्न करणारी आहे. 'मै ना खाऊंगा, ना खाने दूंगा' असे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी जाहीरपणे सांगत असताना उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या निवास्थानी पंधरा कोटी सापडतात, हे धक्कादायक आहे. न्या. वर्मा यांच्या निवासस्थानी स्टोअर रूमला लागलेल्या आगीत नोटांची पुडकी जळाली व त्याचे व्हीडिओ सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचले व सोशल मिडियातूनही व्हायरल झाले. दिल्लीचे पोलीस आयुक्त संजय अरोरा आणि दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवकुमार उपाध्याय यांनी या घटनेसंबंधी दिलेल्या अहवालानंतर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी त्रिसदस्य चौकशी समिती नेमली आहे. त्यात पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती शील नागू, हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती जी. एस. संघवालिया आणि कर्नाटकचे मुख्य न्यायमूर्ती अनू शिवराम यांचा समावेश आहे. न्या. यशवंत वर्मा यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणतेही न्यायालयीन कामकाज देऊ नये असेही आदेश सरन्यायाधीश खन्ना यांनी दिले आहेत. १४ मार्चला लागलेल्या आगीत जळलेल्या नोटांची भली मोठी रोख रक्कम मिळाली या घटनेवरून न्यायव्यवस्थेलाही मोठा धक्का बसला आहे. २० मार्च रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायमूर्तींची कॉलेजियमची बैठक झाली. त्यात न्या. वर्मा यांची अलाहाबाद उच्च न्यायालयाला बदली करावी असा निर्णय घेण्यात आला. न्या. वर्मा हे अलाहाबाद उच्च न्यायालयातूनच सन २०२१ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून बदली होऊन आले होते. पाच न्यायमूर्तींच्या समितीने न्या. वर्मांची अलाहाबादला बदली करण्याची निर्णय घेतला, त्याला अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनने कडाडून विरोध केला. अलाहाबाद उच्च न्यायालय म्हणजे कचराकुंडी नव्हे, असा ठराव बार असोसिएशनने केला. त्यामुळे न्या. वर्मा याचे अलाहाबादला परत जाणे बारगळले व ते स्वत: रजेवर गेले. जो न्यायाधीश दिल्लीत भ्रष्टाचार करतो तो अलाहाबाद उच्च न्यायालयात करणार नाही असे त्यांच्या बदलीची शिफारस करणाऱ्या पाच न्यायमूर्तींच्या समितीला वाटते काय ? न्या. यशवंत वर्मा यांचे वडील न्या. ए. एन. वर्मा हेसुद्धा अलाहाबाद उच्च न्यायालयात न्यायमूर्ती होते. न्या. यशवंत वर्मा यांचा जन्म प्रयागराजचा. बीकॉमची पदवी त्यांनी दिल्ली विद्यापीठातून घेतली. मध्य प्रदेशातील रेवा विद्यापीठातून ते एलएलबी झाले. १९९२ मध्ये त्यांनी लखनऊला वकिली सुरू केली.

अलाहाबाद उच्च न्यायालयात सन २०१२- १३ मध्ये उत्तर प्रदेश सरकारचे वकील म्हणूनही त्यांनी काम केले. सन २०१४ मध्ये ते अतिरिक्त न्यायाधीश झाले. २०१६ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयात ते कायमस्वरूपी न्यायमूर्ती झाले. २०२१ मध्ये त्यांची बदली दिल्लीला झाली. न्यायाधीश होण्यापूर्वी ते उत्तर प्रदेशमधील शिम्बोली साखर उद्योगाचे कार्यकारी संचालक होते. याच कंपनीने पुढे ७ बँकांची कर्जे बुडविल्याचे निष्पन्न झाले. यशवंत वर्मा यांनी सन २०१४ मध्ये साखर उद्योग कंपनीचा राजीनामा दिला, पण तेव्हाच्या सीबीआय चौकशीत वर्मा याच्या नावाची नोंदही होती. लोकसभा निवडणुकीच्या अगोदर आयकर विभागाने काँग्रेस पक्षाला १०५ कोटी रुपये भरण्याविषयी नोटीस पाठवली, पक्षाचे बँक खातेही सील केले. तेव्हा काँग्रेस पक्षाने दिल्ल उच्च न्यायालयात आयकर विभागाच्या नोटिशीला आव्हान देणारी याचिका दाखल केली होती. ती याचिक न्या. वर्मांच्या न्यायालयासमोरच सुनावणीला आली होती. काँग्रेसची याचिका त्यांनी फेटाळून लावली होती. सॅमसंग इंडिया इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि., मारुती सुझुकीला २००० कोटी वसुलीची नोटीस, ऑक्सफॅम इंडिया, केअर इंडिया, नेटफ्लिक्स अनेक बड्या कंपन्यांच्या खटल्यांची सुनावणी न्या. वर्मांच्या कोर्टासमोर झाली. एका प्रकरणात तर त्यांनी मनी लॉड्रिंग वगळता अन्य प्रकरणात इडीने चौकशी का करावी असा मुद्दा उपस्थित केला होता. १४ मार्चला होळीच्या दिवशी रात्री न्या. वर्मांच्या निवास्थानी लागलेल्या आगीची माहिती अग्निशमन दलाला न कळवता अगोदर पोलीस नियंत्रण कक्षाला देण्यात आली होती, न्या. वर्मा म्हणतात आग स्टोअर रूमला लागली. स्टोअर रूम हा काही घराचा भाग नाही. ती रूम वापरातही नाही. न्यायमूर्तींना सरकारी निवासस्थान मिळते. यांचा बंगला व्हीआयपी एरियात आहे. सीसीटीव्ही व सुरक्षा दलाकडे असताना त्यांच्या निवासस्थानी कोटी- कोटी रुपयांची पुडकी कशी आली, कोणी दिली, कोणामार्फत तेथे पोहोचली, हेतू काय, याची चौकशी होणे अपेक्षित आहे. न्या. यशवंत वर्मा यांच्या दिल्लीतील निवासस्थानी लागलेल्या आगीत पाचशे रुपयांची जळलेली खंडीभर पुडकी मिळाल्याने ते स्वत: संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. त्रिसदस्य न्यायमूर्तींच्या समितीला चौकशीसाठी कालमर्यादा नाही पण त्या समितीने दोषी ठरविल्यास न्या. वर्मा यांना राजीनामा देणे भाग पडेल, जर त्यानी राजीनामा दिला नाही, तर त्यांच्या विरोधात संसदेत खासदार महाभियोग नेमण्याची मागणी करू शकतात. आजवर न्यायमूर्तींवर झालेले भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध झालेले नाहीत किंवा कोणा न्यायमूर्तींच्या विरोधात महाभियोगही नेमला गेलेला नाही. न्यायमूर्तींना घटनेनुसार विशेषाधिकार आहेत. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती हे संविधानिक पद आहे. न्यायमूर्तींवर पोलीस थेट एफआयआर दाखल करू शकत नाहीत. राष्ट्रपती सरन्यायाधीशांशी सल्लामसलत करून भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या न्यायमुर्तींवर गुन्हा दाखल करायचा की नाही हे ठरवतील. १९९१ मध्ये मद्रास उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती के. वरास्वामी यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले, तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने वरीलप्रमाणे निर्णय दिला. १९९९ मध्ये न्यायमूर्तींवर अंतर्गत चौकशी करणारी प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाने तयार केली. सन २००३ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाचे न्या. शमिन मुखर्जी यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते. पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी न्या. निर्मल यादव यांच्यावर सीबीआयने भ्रष्टाचाराचे आरोप दाखल केले असून ते न्यायप्रविष्ट आहेत. सन २०१८ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी न्या. एस. एन. शुक्ला यांची अगोदर इन हाऊस चौकशी झाली. सन २०२१ मध्ये सीबीआयने आरोपपत्र दाखल केले आहे.

गेल्या काही वर्षांत निवृत्तीनंतर न्यायमूर्ती लाभाचे पद मिळवतात यावर माध्यमातून टीका झाली आहे. निवृत्तीनंतर न्यायमूर्तींनी राज्यपाल पद स्वीकारणे, राज्यसभेवर खासदार म्हणून जाणे, सरकारी स्तरावर मोठे लाभाचे पद मिळवणे हे कितपत योग्य आहे? पदाचा राजीनामा देऊन राजकीय पक्षाचे उमदेवार म्हणून सार्वजनिक जीवनात वावरणे कितपत औचित्याला धरून आहे? आपल्या कार्यालयातील महिला कर्मचाऱ्याने आपल्यावर केलेल्या आरोपाची स्वत:च सुनावणी घेणारेही न्यायाधीश आहेत. महिलेच्या कमरेखाली वस्त्राला हात घालणे म्हणजे बलात्कार नाही, असा निर्णय देणारेही न्यायाधीश आहेत. निवृत्तीच्या आदल्या दिवशी एका मोठ्या खासगी अभियांत्रिकी संस्थेला अनुकूल निवाडा देणारे न्यायाधीश आहेत. आता तर न्यायमूर्तींच्या निवासस्थानी कोटी कोटी रुपयांची पुडकी मिळाली असतील, तर त्यांनी आजवर दिलेल्या निवाड्यांवर संशय व्यक्त केला गेला तर त्याला रोखणार कसे ? न्यायव्यवस्था पारदर्शक व निष्पक्ष असावी अशी जनतेची अपेक्षा असते. पण पंधरा कोटी जळलेल्या नोटांची पुडकी व्हायरल झाल्यानंतर माय लॉर्ड, संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेतः

# महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढत आहेत हृदयविकार

**हृदय** आणि रक्तवाहिन्यासंबंधी रोगांचा प्रादुर्भाव ऐतिहासिकदृष्ट्या स्त्रियांपेक्षा पुरुषांमध्ये जास्त आहे, परंतु अलीकडे, लिंग गुणोत्तर कमी होत आहे. महिलांमध्येही हृदयविकाराचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे. काही प्रकरणांमध्ये, महिला हृदयविकाराची तीव्रता आणि मृत्यू दरांमध्ये पुरुषांनाही मागे टाकत आहेत. भारतातील महिलांमध्ये हृदयविकाराच्या वाढीस कारणीभूत अनेक घटक आहेत. जाणून घेऊयात सध्या उपलब्ध उपचार पर्यायांपैकी काही महत्वाचे पर्याय आणि पद्धती.



अलीकडील माहितीनुसार, जागतिक स्तरावरील सर्व मृत्युंपैकी हृदय आणि रक्तवाहिन्यासंबंधी रोगांना (उतऊ) ३१% साठी जबाबदार आहेत. भारतात, उतऊ हे पुरुष आणि स्त्रिया दोघांच्या मृत्यूचे प्रमुख कारण आहे, जे २०१६ मधील सर्व मृत्यूंपैकी २८% होते. ऐतिहासिकदृष्ट्या पुरुषांना होण्याचा धोका जास्त असताना, आता अभ्यास असे दर्शविते की हे अंतर कमी होत असून काहीं महिलांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण आता पुरुषांपेक्षा जास्त आहे. याबाबत अधिक माहिती दिली आहे, राहील शाह, संचालक, इऊठ फार्मास्युटिकल्स यांनी.

**महिलांना जागरूक होण्याची गरज**

वृद्धत्व, खाण्याच्या सवयी आणि बदलती जीवनशैली, तसेच इतर वेगाने विकसित होत असलेल्या सामाजिक-आर्थिक निर्धारकांसारख्या अनेक परस्परसंबंधित घटकांमुळे हृदयविकारांमध्ये वाढ होते. या घटकांमुळे निर्माण झालेल्या डोमिनो इफेक्टमुळे हृदय आणि रक्तवाहिन्यासंबंधी रोगांचे प्रमाण वाढते.

**धोका टाळता येतो :** सुधारीत आरोग्य सेवा, उच्च उत्पन्न पातळी, जागतिकीकरण आणि शहरीकरण यासारखे सामाजिक-आर्थिक निर्धारक हे उतऊ जोखीम घटक आहेत जे रोगाच्या घटनेचा धोका कमी करण्यासाठी सहजपणे बदलले जाऊ शकतात, तर वय आणि अनुवांशिक सारखे न बदलता येण्याजोगे जोखीम घटक मात्र नियंत्रित केले जाऊ शकत नाही.

**अनेक आजार जबाबदार :** तणाव, मधुमेह, डिस्लिपिडेमिया, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, धूम्रपान इ. सारखे घटक आणि सह-विकृती, ज्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजार बळावतात. उदाहरणार्थ, आहारातील बदलामुळे अनेक लोक अस्वास्थ्यकारक खाण्याच्या सवयींकडे प्रवृत्त झाले आहेत. गेल्या ४० वर्षांत प्रथिनांचा दरडोई वापर कमी होत असताना, शहरी आणि ग्रामीण भागात चरबीयुक्त सेवनाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. हे, कमी झालेल्या शारीरिक हालचालींसह, उच्च रक्तदाब आणि लठ्ठपणा यांसारख्या मध्यवर्ती जोखीम घटकांना जन्म देते.

**उपायांचा पर्याय**

तथापि, या उपचार पर्यायांची उपलब्धता असूनही, सर्व महिलांना आवश्यक ते उपचार मिळत नाहीत. स्त्रियांचे बहुतेकदा रोगाच्या शेवटच्या टप्प्यात निदान केले जाते, ज्यामुळे उपचारांचा प्रभाव कमी होतो. शिवाय, सध्याचे काही उपचार पर्याय महिलांसाठी त्यांच्या वेगळ्या जैविक आणि हार्मोनल प्रोफाइलमुळे अनुपयुक्त असू शकतात

**हृदयविकारांची वाढ गंभीर**

भारतातील महिलांमध्ये हृदयविकारांची वाढ ही एक गंभीर सार्वजनिक आरोग्य संकट आहे याची जाणीव व्हायला हवी. ज्याचा सामना केवळ आरोग्य सेवा क्षेत्राद्वारे करता येणार नाही. आपल्याला बहु-आयामी दृष्टीकोन आवश्यक आहे ज्यामध्ये शिक्षण, प्रतिबंध, स्क्रीनिंग आणि प्रभावी उपचारांचा समावेश असेल. या चिंताजनक प्रवृत्तीशी लढण्यास मदत करणारे नाविन्यपूर्ण उपाय विकसित करण्यासाठी फार्मास्युटिकल उद्योगही दररोज प्रगती करत आहे.

**नवीन औषधे विकसित**

फार्मास्युटिकल उद्योगांमध्ये विशेषत: हृदयविकार असलेल्या महिलांच्या गरजेनुसार तयार केले जातात. उदाहरणार्थ, महिलांमध्ये अधिक प्रचलित असलेल्या विशिष्ट जैविक मार्गांना लक्ष्य करणारी नवीन औषधे विकसित करण्यात येत आहेत अशी माहिती आम्हाला याद्वारे देण्यात आली आहे. याशिवाय हृदयाच्या आरोग्यावर हार्मोनल चढउतारांच्या परिणामांचा अभ्यास केला जात आहे आणि हे परिणाम कमी करण्यात मदत करू शकणारे उपचार विकसित होत आहेत. हृदयविकार होण्याचा उच्च धोका असलेल्या महिलांना मदत करण्यासाठी आणि निदान, उपचार सक्षम करण्यासाठी अनुवांशिक चाचणी सारखे उपचार साधने सुधारण्यावर काम सध्या चालू आहे, ज्यामुळे या घटक आजारावर अधिक अचूक उपचार करता येतील.

# यशस्वी होण्यासाठी काय करायला हवे!

**आयुष्यात** प्रत्येक व्यक्तीला यशस्वी होण्याची आस असते. पण, यशस्वी होणे म्हणजे नेमके काय? तर, आपल्या मनातून आपण ठरवलेले ध्येय आपण साध्य करणे म्हणजे यशस्वी होणे. पण, असे अनेक लोकांच्या बाबतीत घडत नाही. ध्येय तर हे लोक ठरवतात. पण, ते पूर्ण मात्र करू शकत नाहीत. यामागे बरे कारण काय असेलः? खरेतर येथेच मेख आहे. आपण यशस्वी का होत नाही यावर विचार करण्यापेक्षा आपण यशस्वी होण्यासाठी काय करायला हवे यावर विचार करायला हवा.आपल्या जीवनात आलेले अपयश हेच सिद्ध करते की, यशस्वी होण्यासाठी योग्य प्रयत्न आपण केले नाहीत. म्हणूनच यशस्वीतेकडे जीवनाला न्यायचे असेल, तर जगभरातील यशस्वी लोकांचा अभ्यास करा. त्यांच्याकडून प्रेरणा घ्या. यशस्वी होण्यासाठी त्यांनी काय काम केले किंवा काय मार्ग वापरला याचा बारकाईने अभ्यास करा. जीवनात त्यांना काम करा किंवा न करा पण त्यांचा अभ्यास नक्की करा त्यांचे मार्ग अवलंबण्याचे प्रयत्न करा.

आपल्या शरीराकडून जो व्यक्ती आयुष्यात नेहमीच योग्य कष्टाची अपेक्ष करतो, योग्य कारणासाठी आपली शक्ती खर्च करतो त्या माणसाला यशापासून कोणतीच शक्ती रोखू शकत नाही. पण जो व्यक्ती तशी अपेक्षा आपल्या शरीराकडून न ठेवता कामचुकारपणा, आळस, कंटाळा, पाट्या टाकण्याचे काम करतो, तो कधीच यशस्वी होऊ शकत नाही. एका रात्रीत कोणताही व्यक्ती यशस्वी होत नाही. कष्ट आणि निष्टेचे खत त्यासाठी घालावे लागते. हे सर्व करत असताना माणसाचा आत्मविश्वास कामी येतो. आत्मविश्वास ज्याच्या मनात ठासून भरला आहे. कोणतेही काम त्याला अशक्य नसते. या लोकांची कार्यपद्धती लाथ मारीन तेथे पाणी काढील अशी असते. यश अशा लोकांना लवकर भेटते.

आपल्या ध्येयाकडे न थांबता न थकता जो व्यक्ती चालत राहतो त्याला आपले ध्येय कधीच दूर नसते. काहीही झाले तर हे लोक आपले ध्येय मिळवतातच मिळवातात. जीवनात यशस्वी होण्यासाठी कष्टाची तयारी ठेवा. कारणे सांगत बसू नका. तुम्हाला कारणे मागे खेचतील. पण विचार तुम्हाला ध्येयाप्रती पोहोचण्यास मदत करते. अल्पसंतृष्ट राहू नका- अनेक लोकांना अल्पसंतृष्ट राहण्याची भारी हौस असते. जे लोक मिळाले आहे त्यात धन्यता मानतात. पण, एवढ्याने तुमची स्वप्ने साकार होत नाहीत. त्यासाठी सतत आपली महत्वाकांक्षा वाढती ठेवायला हवी.

**जीवनात सतत यशस्वी होण्याची कारणे**

आम्ही आयुष्यामध्ये अनेकदा सतत यशच मिळवत राहतो आणि या गोष्टीचा आपल्याला पत्ताही लागत नाही की, आम्ही सतत यशस्वीच होत आहोत. आयुष्यात सतत यशस्वी होण्याची काही कारणे असतात. त्याचा आढावा.

यशस्वी होण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण हे की तुम्ही तुमच्या जीवनाचा जो मार्ग बनवला आहे, त्याच मार्गावरून चालत आहात. तुम्ही तुमचा जीवन मार्ग बनविण्याचे धारिष्ट्य दाखवले आहे आणि हेच तुमच्या यशस्वितेचे कारण आहे. अनेक गोष्टी आणि परिस्थितीमुळे तुम्ही घाबरता, परंतु मनातील या भीतीवर मात करण्याचे तुम्ही शिकला आहात. हळूहळू अनुभवाने तुम्ही तुमच्या मनातील विविध प्रकारच्या भीतींवर मात केलेली आहे.मोठे यश मिळविताना आपण अनेक वेळा अयशस्वी होतो, परंतु या अपयशामुळे खचून न जाता तुम्ही त्यातून मार्ग काढता आणि पुढे जाता.तुम्ही प्रत्येक दिवशी नवीन काहीतरी शिकता आणि प्रत्येक दिवशी स्वत:ला बळकट समजता तुमच्यावर कोणी प्रेम करो किंवा ना करो सर्वात प्रथम तुम्ही स्वत:वर प्रेम करत असतात. तुम्ही सर्वांशी खुलेपणाने भेटता आणि कोणाबद्दलही पूर्वग्रहदूषित विचार करत नाही. तसेच कोणतीही धारणा मनात बनवत नाहीत. तुमच्यामुळे अनेक लोकांच्या चेह-यावर हास्य येते ही गोष्ट तुम्हाला चांगली माहीत झालेली आहे. अनेक लोकांच्या हास्याचे कारण तुम्ही आहात. तुम्ही तुमच्या आयुष्यामध्ये सगळेच नाही पण जितके लोक बघितले, तेवढे सगळे लोक अफलातून आहेत. प्रत्येक माणसाकडून तुम्ही काही ना काही शिकलेले आहात. जे लोक तुमचे घनिष्ठ मित्र आहेत, त्यांच्यावर प्रेम करताना तुम्ही स्वत:ला विसरून जाता. पश्चात्तापाच्या ओझ्याखाली काम करणे तुम्ही सोडून दिलेले आहे. जे तुम्हाला पसंत आहे, तेच काम तुम्ही करता. दुस-याच्या पसंतीनुसार तुम्ही काम करीत नाही. दुस-यावर प्रभाव टाकण्यासाठी तुम्ही जास्त पैसे खर्च करीत नाही. तसेच दुस-याला समाधानी बनवण्याचा प्रयत्न करीत नाहीत.तुम्ही दुस-याचा मान तर जरूर राखता, त्याच्याअगोदर स्वत:चा मान जास्त राखता. स्वत:चे महत्त्व, तुम्हाला चांगले कळते.

तुम्हाला ही गोष्ट चांगल्या पद्धतीने माहीत आहे की दुस-याला खुश करण्याची गरज नाही, तसेच तसे काही करण्याचा तुम्ही प्रयत्नही करीत नाही.जीवनात यश आणि आनंद मिळविण्यासाठी यश काही प्राप्त करणे महत्त्वाचे नाही तर जे काही मिळाले आहे, त्याचाच चांगल्या पद्धतीने उपयोग करणे महत्त्वाचे आहे.

# अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयावर 'सुप्रिम'ची नाराजी

## असंवेदनशील व अमानवी, बलात्कारासंबंधी निकाल

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या एका वादग्रस्त निकालावर स्थगिती दिली आहे. अल्पवयीन मुलीवरील बलात्काराच्या प्रकरणात अलाहाबाद उच्च न्यायालयाने १७ मार्च रोजी दिलेल्या निकालावर सर्वोच्च न्यायालयाने संज्ञान घेत सुनावणी करण्याचा निर्णय घेतला होता. यावर आज सुनावणी घेण्यात आली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निकालावर स्थगिती दिली आहे.



एका अल्पवयीन मुलीवरील बलात्काराच्या खटल्यात अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेला निकाल वादग्रस्त ठरला होता. पीडितेच्या स्तनांना स्पर्श करणे, तिच्या पायजम्याची नाडी सोडणे आणि पीडितेला ओढून पुलाखाली नेण्याचा प्रयत्न करणे या गोष्टी बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यासाठी पुरेशा नाहीत, असे अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश राम मनोहर नारायण मिश्रा यांनी म्हटले होते. यावर सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, 'अलाहाबाद उच्च न्यायालयाचा हा निकाल पूर्णपणे असंवेदनशील व अमानवी दृष्टीकोन दर्शवतो'.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे की आम्हाला याप्रकरणी निकाल देताना आणि उच्च न्यायालयाचा निकाल चुकीचा असल्याचं सांगताना खेद वाटतो की त्यांच्या काही टिप्पण्यांमध्ये संवेदनशीलतेचा अभाव दिसत आहे. सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालावर कठोरपणे असहमती दर्शवली आहे.

न्यायमूर्ती बी. आर. गवई म्हणाले, ङ्गउच्च न्यायालयाचा निकाल आमच्यासाठी धक्कादायक होता.

**१४ वर्षे जुने होते प्रकरण**

उत्तर प्रदेशच्या कासगंज येथे २०११ मध्ये हा गुन्हा घडला होता. दोन आरोपींनी एका ११ वर्षीय मुलीवर लिफ्ट देण्याच्या बहाण्याने अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला होता. दोन्ही आरोपींनी तिच्या छातीला स्पर्श केला, तिच्या पायजम्याची नाडी सोडली, तसेच तिला ओढून पुलाखाली नेण्याचा प्रयत्न केला. दोघांनी तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला, मात्र पादचाऱ्यांनी या दोघांना हटकल्यानंतर दोन्ही आरोपींनी तिथून पळ काढला होता.

## मोहमेडन एज्युकेशनल कॉन्फरन्स संस्थापक सर सय्यद अहमद खान यांचा आज स्मृतिदिन

सर सय्यद अहमद खान यांचा आज स्मृतिदिन. सर सय्यद अहमद खान हे विख्यात विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ व राजनीतिज्ञ होते. त्यांचा जन्म १७ ऑक्टोबर १८१७ रोजी दिल्ली येथे झाला. त्यांना औपचारिक शिक्षण मिळालेले नव्हते. त्यांची आई हीच त्यांची पहिली गुरू होती. परोपकारी वृत्तीच्या या स्त्रीचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला होता. पवित्र कुराण, गुलिस्ताँ, बोस्ताँ यांसारखे फार्सी ग्रंथ, काही अरबी ग्रंथ ते निरनिराळ्या व्यक्तींकडून शिकले.

गणित आणि भूमिती यांचाही त्यांनी अभ्यास केला. मिर्झा गालिब यांच्यासारख्या थोर उर्दू कवीचा निकट सहवास त्यांना लाभला आणि त्यांच्या काव्याने ते प्रभावित झाले. बिजनोर येथे सद्र अमीन या पदावर त्यांची १८५५ मध्ये नेमणूक झाली. त्यांनी उत्तर प्रदेशातील अलीगढ येथे मोहमेडन अँग्लो-ओरिएंटल महाविद्यालय स्थापन केले १८७५. मुसलमान तरुणांना उदार, आधुनिक शिक्षण मिळावे, हा हेतू त्यामागे होता. नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर १८७६ मध्ये त्यांनी पवित्र कुराणावर भाष्य लिहिण्यास आरंभ केला.

सन १८७८मध्ये व्हाईसरॉयच्या लेजिस्लेटिव्ह काऊन्सिलवर त्यांची नियुक्ती करण्यात आली. सन १८८३ मध्ये अलीगढमध्ये त्यांनी मोहमेडन असोसिएशनची स्थापना केली. त्याचप्रमाणे सन १८८६ मध्ये त्यांनी मोहमेडन एज्युकेशनल कॉन्फरन्सची स्थापना केली. मुसलमानांची सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टी बदलावी, हे या संघटनेचे उद्दिष्ट होते. बरानीचे तारीख-इ-फिरोझशाही, अबुल फज्लची आइन-ए-अकबरी, जहांगीरचे तुझुक हे ग्रंथ त्यांनी संपादिले. बायबलवर त्यांनी भाष्य लिहिले (तबियिन-उल-कलाम). धर्मांच्या तौलनिक अभ्यासाचा हा पहिला प्रयत्न मानला जातो. सन १८५७ च्या उठावानंतर त्यांनी लिहिलेले हिस्टरी ऑफ बिजनोर आणि हिस्टरी ऑफ द रिव्होल्ट ऑफ बिजनोर हे ग्रंथही महत्त्वाचे आहेत. अशा या व्यासंगी महान शिक्षणतज्ज्ञाचे दि.२७ मार्च १८९८ रोजी निधन झाले.

संकलन -
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
रामनगर, गडचिरोली.

# एन.डी.ए.,सी.डी.एस.परीक्षा १३ एप्रिल रोजी; ४४४७ उमेदवारांची बैठक व्यवस्था

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली यांचे मार्फत राष्ट्रीय संरक्षण व नौसेना अकादमी आणि सीडीएस ही परीक्षा रविवार दि.१३ एप्रिल रोजी होणार आहे. या परीक्षांसाठी छत्रपती संभाजीनगर केंद्रावर ४४४७ उमेदवार प्रविष्ठ होणार आहेत,अशी माहिती जिल्हा पर्यवेक्षकीय समन्वय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी सामान्य श्रीमती संगीता राठोड यांनी दिली आहे.

संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली यांचे मार्फत जिल्हा केंद्रावर रविवार दि.१३ एप्रिल रोजी राष्ट्रीय संरक्षण व नौसेना अकादमी (एन.डी.ए.)आणि सीडीएस परीक्षा २०२५ होणार आहे.

एनडीए परीक्षा एकूण १२ उपकेंद्रावर होईल. ह्या परीक्षेचे पहिले सत्र सकाळी १० ते दुपारी साडेबारा तर दुसरे सत्र दुपारी दोन ते साडेचार वाजेपर्यंत असेल.

सीडीएस परीक्षा एकूण २ केंद्रांवर व तीन सत्रात होईल. पहिले सत्र सकाळी ९ ते ११ वा. पर्यंत व दुसरे सत्र दुपारी १२ ते दुपारी २ वा. पर्यंत तर तिसरे सत्र दुपारी ४ ते सायं.६ वाजेपर्यंत होईल. एकूण १४ उपकेंद्रावर या दोन्ही परीक्षांचे नियोजन करण्यात आले आहे. या परीक्षेसाठी एकूण ४४४७ उमेदवारांना आयोगाकडून प्रवेश देण्यात आला आहे.

परीक्षेसंदर्भात संघ लोकसेवा आयोगाने जारी केलेल्या सुचनाः-

परीक्षा कक्षात प्रवेश मिळिवण्यासाठी उमेदवारांने प्रवेशपत्र व स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्ट कार्ड या प्रकाराचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्यांची छायांकीत प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. परीक्षा कक्षामध्ये पेपर सुरु होण्याच्या एक तास अगोदर प्रवेश देण्यात येईल.परीक्षेच्या वेळी कक्षात प्रवेशप्रमाणपत्र, काळ्या शाईचे बॉल पॉईंट पेन, ओळखपत्र व ओळखपत्राची छायांकीत प्रत, मास्क, पारदर्शक सॅनिटायझर बॉटल या व्यतिरिक्त अन्य कोणतेही साहित्य अथवा वस्तु परीक्षाकक्षामध्ये घेऊन जाण्यास परवानगी नाही.

उमेदवारांना डिजीटल डायरी, मायक्रोफोन, मोबाईल, ब्लुटुथ, कॅमेराफोन किंवा तत्सम कोणतेही संदेशवहन उपकरण इलेक्ट्रॉनिक साहित्य परीक्षाकक्षात नेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य सोबत आणल्यास उमेदवारांना स्वत:च्या जबाबदारीवर परीक्षा केंद्राच्या आवाराच्या मुख्य दरवाजाबाहेरच ठेवावे लागेल. तसेच असे साहित्य ठेवण्याची जबाबदारी आयोगाची असणार नाही. परीक्षा केंद्राच्या आवाराच्या मुख्य दरवाजाच्या आत असे साहित्य आणल्यास उमेदवारांवर फौजदारी व प्रशासकीय कारवाईसह त्यांना आयोगाच्या आगामी परीक्षांकरीता बंदी घालण्यात येईल. परीक्षा केंद्राच्या प्रवेशद्वारावरच परीक्षेच्या दिवशी उमेदवाराची तपासणी पोलिसांमार्फत करण्यात येणार आहे.महिला उमेदवारांकरीता महिला पोलिसांमार्फत तपासणी करण्यात येईल. आयोगाकडून उमेदवारांना ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले प्रवेश प्रमाणपत्र हे त्यांच्यासाठी प्रवेशाचा पास म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. तसेच परीक्षेसाठी स्वतंत्र ई-पास अथवा इतर कोणत्याही परवानगीची आवश्यकता असणार नाही. तथापि, प्रवेश प्रमाणपत्रासोबत उमेदवाराने ओळखीच्या पुराव्याकरीता आधारकार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट, निवडणूक ओळखपत्र अथवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी कोणतेही एक पुरावा जवळ बाळगणे व तसे तपासणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहिल, असे जिल्हा पर्यवेक्षकीय समन्वय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती संगीता राठोड यांनी कळिवले आहे.

परीक्षा केंद्र याप्रमाणे :-

१. मौलाना आझाद कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स डॉ.रफिक झकेरिया कॅम्पस, सायन्स बिल्डींग, रोझा बाग हर्सुल रोड - २७७

२. मौलाना आझाद कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स टॉम पॅट्रीक बिल्डींग, सायन्स बिल्डींग, रोझा बाग हर्सुल रोड - ३३८

३. शासकीय कला व विज्ञान महविद्यालय, सुभेदार गेस्ट हाऊस जवळ किलेअर्क, लेबर कॉलनी -३८४

४. डॉ.रफिक झकेरिया कॉलेज फॉर वुमन नवखंडा, ज्युबली पार्क - ३८४

५. सरस्वती भुवन, मुलांची शाळा, सरस्वती कॉलनी औरंगपुरा - ३८४

६. विवेकानंद कला व सरदार दिलीपसिंग वाणिज्य महाविद्यालय, समर्थ नगर - २८८

७. विवेकानंद विज्ञान महाविद्यालय, समर्थ नगर -२८८

८. शिशु विहार हायस्कूल, महात्मा फुले चौक, औरंगपुरा -२८८

९. सरस्वती भुवन, कला व वाणिज्य महाविद्यालय, (पार्ट - अ) औरंगपुरा - ३८४

१०. सरस्वती भुवन, कला व वाणिज्य महाविद्यालय, (पार्ट - ब) औरंगपुरा - ३८४

११. मिलिंद विज्ञान महाविद्यालय, नागसेन वन परिसर, छावणी परिसर - २८८

१२. डॉ. सौ इंदिराबाई भास्करराव पाठक कला महविद्यालय, समर्थ नगर - २८८

१३. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रेल्वे स्टेशन रोड उस्मानपुरा - २७७

१४. शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, रेल्वे स्टेशन रोड उस्मानपुरा - १९५

# दिशा सालियन मृत्यू प्रकरणात नवा ट्विस्ट; आदित्यचा ड्रग्ज व्यवसाय; स्टिव्ह पिंटोला कोणी गायब केले?

## वकील निलेश ओझांचे गंभीर आरोप

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दिशा सालियन मृत्यू प्रकरणात दिशा सालियन यांचे वडील सतीश सालियन यांची कायदेशीर बाजू मांडणारे वकील निलेश ओझा यांनी माध्यमांशी संवाद साधताना काही धक्कादायक दावे केले आहेत.

आदित्य ठाकरे यांचा ड्रग्स व्यवसायात सहभाग - ओझा यांनी दावा केला की, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोच्या तपासानुसार आदित्य ठाकरे यांचा ड्रग्स व्यवसायात सहभाग आहे आणि त्यासंबंधीचे ठोस पुरावे त्यांच्याकडे आहेत. त्यांनी सांगितले की, आदित्य ठाकरे आणि दिनो मोरिया यांच्यातील फोन संभाषण हे त्याचे स्पष्ट पुरावे आहेत. समीर खान नावाच्या व्यक्तीची "DA-50' नावाची कंपनी आहे, जी ड्रग्ज सिंडिकेटशी संबंधित असल्याचे NCB ने स्पष्ट केले होते. या कंपनीशी दिनो मोरिया, सूरज पांचोली आणि आदित्य ठाकरे नियमित संपर्कात असतात. तसेच, आदित्य ठाकरेंचा सहभाग समोर आल्यानंतर छउइ आणि समीर वानखेडेंना कारवाई करण्यापासून कोणी रोखले? यासाठी किती कोटींची डील झाली?, असे प्रश्न ओझा यांनी उपस्थित केले.

दिशा सालियन प्रकरणात उद्धव ठाकरे देखील आरोपी- ओझा यांनी हेही आरोप केले की, दिशा सालियन प्रकरणात उद्धव ठाकरे देखील आरोपी आहेत. आदित्य ठाकरेंच्या गुन्ह्यावर पांघरूण घालण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाचा गैरवापर केला. त्या काळात ते मुख्यमंत्री होते आणि त्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग केला, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

आवाज उठवण्यास उशीर झाला असे म्हणणाऱ्या व्यक्तींवरही कारवाई व्हावी - दिशाच्या कुटुंबीयांनी पाच वर्षांनंतर आवाज उठवण्यावर काहीजण प्रश्न उपस्थित करत असल्यावर ओझा म्हणाले, ङ्ग११ डिसेंबर २०२३ रोजी सतीश सालियन यांचा जबाब विशेष तपास पथकाने (SIT) नोंदवला. त्यांनी प्रकरण पुन्हा उघडण्याची आणि आरोपींवर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यामुळे आता आवाज उठवण्यास उशीर झाला असे म्हणणाऱ्या व्यक्तींवरही कारवाई व्हावी, अशी आमची मागणी आहे.

**स्टिव्ह पिंटोला कोणी गायब केले? -** याशिवाय, त्यांनी स्टिव्ह पिंटो नावाच्या व्यक्तीचा उल्लेख करत काही धक्कादायक गोष्टी सांगितल्या. ङ्गस्टिव्ह पिंटो हा दिशाचा मित्र होता. त्याने काही ट्विट्स करून ७ जून २०२० रोजी एकता कपूरच्या घरी झालेल्या पार्टीविषयी माहिती दिली होती. त्या पार्टीला परमवीर सिंग, सुशांत सिंह राजपूत, दिशा सालियन आणि आदित्य ठाकरे हे उपस्थित होते. त्या ट्विट्समध्ये दिशाच्या हत्येचे संकेत दिले होते. मात्र, त्यानंतर स्टिव्ह पिंटो गायब झाला. स्टिव्ह पिंटोला कोणी गायब केले? त्यामुळे त्याचा शोध घेऊन चौकशी करावी,ङ्घ अशी मागणी ओझा यांनी केली.

**आमची तक्रार खोटी ठरली, तर आम्हाला फाशी द्या -** शेवटी, त्यांनी थेट आव्हान दिले की, ङ्गआमची तक्रार खोटी ठरली, तर आम्हाला कठोर शिक्षा द्या, फाशी द्या. पण आधी ऋखठ दाखल करून योग्य तपास करा. तपास टाळण्याचे कारण काय? छत्रपतींच्या भूमीत एका अत्याचारित तरुणीच्या वडिलांना पाच वर्षे न्यायासाठी फिरावे लागत आहे, हे लाजिरवाणे आहे,ङ्घ असे ओझा यांनी ठणकावून सांगितले.

# जिल्हा कार्यकारी समितीची बैठक; कैद्यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र सुरू करा-जिल्हाधिकारी स्वामी




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

कारागृहातील कैद्यांना बंदिवासात कौशल्य प्रशिक्षण दिल्यास त्यांचे पुढील आयुष्यात पुनर्वसन करणे अधिक सुकर होईल. त्याकरीता जिल्हा कारागृहातील कैद्यांसाठी कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरु करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. जिल्हा कौशल्य विकास आराखड्या संदर्भात या बैठकीत चर्चा झाली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, सहाय्यक आयुक्त सुरेश वराडे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार, उद्योग निरीक्षक ए.एस. जरारे, कृषी विज्ञान केंद्राच्या डॉ.अनिता जिंतुरकर, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उपसंचालक पी.बी. दुर्गे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या जिल्हा समन्वयक सुचिता खोतकर, अटल इंक्युबेशन सेंटरचे संचालक वैभव खैरनार, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अभिजीत अल्टे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीवास्तव, तंत्रनिकेतन विद्यालयाचे खराळ, सीपेट प्रशिक्षण संस्थेच्या मौसम चौधरी, नेहरू युवा केंद्राचे जिल्हा समन्वयक संकल्प शुक्ला आदी उपस्थित होते. जिल्हा कौशल्य विकास आराखड्यात कारागृहातील कैदी व दिव्यांग व्यक्ती यांच्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचे ठरविण्यात आले. त्यात कारागृहातील कैद्यांना विविध उद्योगांसाठी आवश्यक असलेले पायाभूत प्रशिक्षण दिले जाईल. या प्रशिक्षणामुळे कैद्यांना रोजगार संधी उपलब्ध व्हाव्यात.

प्रशिक्षणामुळे कैद्यांमध्ये सकारात्मक मानसिक बदल घडवून आणण्यास मदत होईल. तुरुंगवासानंतर समाजात मुख्य प्रवाहात सामील होण्याची संधी मिळेल. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींसाठी देखील कौशल्य विकास प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार आहे, ज्यामुळे त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन ते आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, अशी भुमिका जिल्हाधिकारी स्वामी यांनी मांडली.

त्यानुसार कौशल्य व उद्योजकता विकास विभागाने प्रस्ताव सादर करावा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात यावा. दि.१ मे रोजी जिल्हा कारागृहात कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू होईल असे नियोजन करावे. जिल्ह्यातील नाविन्यपूर्ण उपक्रमात या उपक्रमाचा समावेश करावा.अधिक सकारात्मकतेने योगदान द्यावे असे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले. जिल्ह्यातील विविध संस्था आणि विभागांच्या मदतीने हा उपक्रम राबविला जाणार आहे.

# न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली; विटभट्टी बंद न केल्यास उपसरपंच सुनील घुसळे यांचा उपोषणाचा इशारा

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

उच्च न्यायालय आणि तहसीलदार यांच्या स्पष्ट आदेशानंतर ही सुलींभजन गावात सुरू असलेली विटभट्टी अद्याप बंद करण्यात आलेली नाही यामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून, ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुनील तुकाराम घुसळे यांनी संबंधित मंडळ अधिकारी व तहसील अधिकाऱ्यांना निवेदन देत १ एप्रिल २०२५ पासून बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे. संबंधित वीट भट्ट्या चालकांना तहसीलदार यांना दिलेले आदेशात ३६ लाख रुपयाचे दंड आदेश दिले मात्र आद्यपर्यंत या वीट भट्ट्याच्या चालाकावर कोणत्याही कारवाई करण्यात आली नाही या अनुषंगाने चुलीभंजन ग्रामपंचायतचे उपसरपंच सुनील तुकाराम घुसळे यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.

उच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२५ रोजी आणि तहसीलदारांनी १२ मार्च २०२५ रोजी विटभट्टी बंद करण्याचे तसेच संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. मात्र, प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. उपसरपंच घुसळे यांच्या मते, या विटभट्टीमुळे मोठ्या प्रमाणावर गौणखनिज उत्खनन होत असून,शासनाच्या लाखो रुपयाचे महसुलाचे नुकसान होत आहे.

प्रदूषणाचा धोका आणि आरोग्य संकट

सदर विटभट्टीमुळे गावातील पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहे. हवेत वाढलेले धूळकण आणि प्रदूषण यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. याशिवाय,शासनाने आदेश देऊनही कारवाई न केल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. तात्काळ कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

उपसरपंच घुसळे यांनी प्रशासनाला आठ दिवसांची मुदत दिली असून, या कालावधीत विटभट्टी बंद न केल्यास तहसील कार्यालया समोर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. या सोबतच, न्यायालयाच्या आदेशांची अवहेलना केल्या प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणीही केली आहे.

ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते या आंदोलनाला पाठिंबा देत असून, प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आधार बायोमेट्रिक अद्यावतीकरण करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आधार कार्डसाठी मँडेटरी बायोमेट्रिक अपडेट करणे आवश्यक असून, नागरिकांनी आपली नोंदणी वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

अद्यावतीकरण कोणाला आवश्यक- ज्या बालकांचे ० ते ५ वयात आधार कार्ड तयार झाले आहे, त्यांना ५ ते ७ वर्षे वयात बायोमेट्रिक अपडेट करणे आवश्यक आहे. तसेच, १५ ते १७ वर्षे वयोगटातील युवकाचे देखील बायोमेट्रिक अपडेट करणे बंधनकारक आहे.

४ लाख ५१ हजार ५३६ जण अद्यावतीकरणास पात्र - छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण २,६६,४२९ पाच ते सात वर्षे वयोगटातील बालक आणि १,८५,१०७ पंधरा ते सतरा वर्षीय युवक असे एकूण ४ लाख ५१ हजार ५३६ बालक व युवक आधार बायोमेट्रिक अद्यावतीकरणासाठी पात्र आहेत.

अद्यावतीकरण विनामूल्य - आधारच्या नियमांनुसार, हे अद्ययावत करणे विनामूल्य असून नागरिकांना कोणतेही शुल्क द्यावे लागणार नाही. यासाठी नागरिकांनी जवळच्या आधार नोंदणी केंद्रात जाऊन आपली बायोमेट्रिक माहिती अद्यावत करून घ्यावी. अधिक माहितीसाठी जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजना; कन्नड तालुक्यात ६० लाभार्थ्यांना ९१ हे.जमिनीचे वाटप



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजने अंतर्गत कन्नड तालुक्यातील ६० लाभार्थ्यांना सोडत पद्धतीने एकुण ९१ हे ०१ आर (२१२ एकर २६ गुंठे) जमीन वाटप करण्यात आली.

कन्नड येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयातील दालनात उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसिलदार विद्याचरण कडवकर, नायब तहसिलदार प्रशांत काळे, तालुका कृषी अधिकारी संदीप सिरसाठ, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक श्रीमती सीमा सिंदीकर यांच्या उपस्थितीत नीदा नवीद खान वय ५ वर्ष या मुलीच्या हस्ते सोडत काढण्यात आली. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण स्वाभिमान योजनेअंतर्गत म ागासवर्गीय संवर्गातील भुमिहिन शेतमजूरांना ही जमिन शेतीसाठी १०० टक्के अनुदानावर देण्यात येते. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रेषेखालील भुमिहिन कुटूंब सन २०२१-२०२२ पासुन लाभ मिळण्याच्या प्रतिक्षेत होते. त्यासाठी समाज कल्याण विभागाने सन २०२२-२३, २०२३-२४ व चालु वर्षात जमीन खरेदी करुन लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. याकामी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी पुढाकार घेतला. त्यासाठी आज कन्नड उपविभागीय कार्यालयात सोडत पद्धतीने चिठ्या काढुन मौ.माळेगांव लोखंडी, माळेगांव ठोकळ, वासडी, पळशी बु, नादरपुर व गौरपिंपरी या ठिकाणच्या जमीनी प्रति लाभार्थी चार एकर (कोरडवाहु) प्रमाणे निवड करण्यात आली. या ६० लाभार्थ्यांच्या जमिन मालकीच्या आदेशासाठी जिल्हाधिकारी अध्यक्ष जिल्हास्तरीय समि तीकडे अंतीम मंजुरीसाठी सादर करण्यात येईल. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये या लाभार्थ्यांना सातबारा उतारा मिळेल.

महसुल सहाय्यक जीवन चव्हाण, सम न्वयक अभिजित पानट, मंडळ अधिकारी विकास वाघ, तलाठी संगीता सुर्यवंशी, तलाठी एस. ए. बावस्कर, शिरस्तेदार आनंद शिंदे, तलाठी एस.डी.विसपुते, ग्राम विकास अधिकारी के एस थोरात, ग्रामसेवक एस. एस. गोसावी आदींनी परिश्रम घेतले यावेळी लाभार्थी उपस्थित होते.

# नाशिकमध्ये स्पीकरचा आवाज कमी करण्यास सांगितल्याने तणाव; दगडफेक, वाहनांची तोडफोड

नाशिक : अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खुटवड नगर परिसरात एका महिलेने मुलांची परीक्षा सुरू असल्यामुळे स्पीकरचा आवाज कमी करण्याची विनंती केली. मात्र, यामुळे संतापलेल्या तरुणाने तिच्या घरावर दगडफफ ेक करत वाहनांची तोडफफोड केली. या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला असून, पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खुटवड नगर पोलीस चौकीसमोरील वेणु नगर भागात पुनित बन्सल हे आपल्या कुटुंबासह राहतात. त्यांच्याच घराच्या मागे कुंवर नावाचा तरुण (वय २५ वर्षे) राहतो. सध्या बन्सल यांच्या मुलीची परीक्षा सुरू असल्याने ती अभ्यासात मग्न होती. मात्र, याच दरम्यान, कुंवरने आपल्या घरातील स्पीकर मोठ्या आवाजात लावला होता.

स्पीकरच्या मोठ्या आवाजामुळे मुलीच्या अभ्यासात व्यत्यय येत असल्याने तिने आपल्या आईकडे तक्रार केली. त्यानंतर बन्सल यांच्या पत्नीने कुंवरला स्पीकरचा आवाज कमी करण्याची विनंती केली. मात्र, या गोष्टीचा राग आल्याने कुंवरने बन्सल यांच्या घरात घुसून साहित्याची नासधूस केली. तसेच घरातील लहान मुलांची सायकल आणि बाहेर लावलेली दुचाकी रस्त्यावर फेकून दिली.

यावरही न थांबता, कुंवरने संतापाच्या भरात बन्सल यांच्या घरावर दगडफफेक केली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

घटनेनंतर पुनित बन्सल यांनी अंबड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यासाठी धाव घेतली. अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली रात्री उशिरा गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, परीक्षेच्या काळात होत असलेल्या अशा घटनांमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. पोलीस प्रशासनाने त्वरित कारवाई करत आरोपीला अटक करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ट्रेडबायनरी कंपनीत दापोलीतील तरुणांमधून आयटी तज्ज्ञ घडविणार

मुंबई : ट्रेडबायनरी या आघाडीच्या तंत्रज्ञान आणि कन्सल्टिंग कंपनीने महाराष्ट्रातील दापोलीमध्ये आयटी तज्ज्ञ तयार करण्यासाठी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) अंतर्गत हा उपक्रम राबवला जाणार आहे. या उपक्रमामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातल्या तरुणांना आयटी क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच दापोली तालुक्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. दापोली मॉडेल यशस्वी झाले तर ट्रेडबायनरी कंपनी भारतातील ग्रामीण भागाला जागतिक आयटी क्षेत्रामध्ये पॉवरहाऊस बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर काम करणार आहे.

ट्रेडबायनरी कंपनी शहर आणि ग्रामीण भागातील गुणवंतांमधील फरक कमी करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. हा उपक्रम आयटी विकेंद्रीकरणासाठी स्केलेबल मॉडेल आहे, जो भारतातील डिजिटल कर्मचारीवर्ग क्रांतीसाठी उदाहरण निर्माण करेल असा विश्वास ट्रेडबायनरीचे संस्थापक व संचालक असलेल्या युवराज शिधये आणि दर्शिल शाह या दोघांनी व्यक्त केला.

# अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे सूप वाजले

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा समारोप बुधवार, २६ मार्च रोजी झाला. या अधिवेशनात विरोधकांनी आपले अस्तित्व दाखवण्याचा प्रयत्न केला, मात्र लोकहिताच्या आणि राज्याच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयांवर अपेक्षित चर्चा झालेली नाही. तरीही, अधिवेशनादरम्यान सरासरी दररोज ९ तास ५ मिनिटे कामकाज झाले, ही जमेची बाजू ठरली.

संविधानाच्या अमृतम होत्सवावर चर्चा

भारतीय गणराज्याच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त संविधानाच्या गौरवशाली वाटचालीवर चर्चा घेण्यात आली. या चर्चेत सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही सहभाग घेतला. मात्र, चर्चेच्या वेळी एकमेकांवर संविधानाच्या पायमल्लीचे आरोप करण्याची स्पर्धा दिसून आली. चर्चेच्या उत्तरादाखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत भाषण केले, ज्याचे शिवसेना (उबाठा) ने कौतुक केले.

लाडक्या बहिणींच्या अनुदानवाढीची अपेक्षा फोल

अधिवेशनात लाडक्या बहिणींच्या अनुदानाची रक्कम १५०० रुपयांवरून २१०० रुपये करण्यात येईल, अशी अपेक्षा होती. मात्र, हे आश्वासन पूर्ण न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

पुढील अधिवेशन सोमवार, ३० जून २०२५ पासून सुरू होणार आहे.

**अधिवेशन कालावधीतील कामकाजाचा आढावा**

- एकूण बैठका: १६
- एकूण कामकाजाचे तास: १४६
- अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ: १ तास २५ मिनिटे
- मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे वाया गेलेला वेळ: २० मिनिटे
- रोजचे सरासरी कामकाज: ९ तास ७ मिनिटे

**प्रश्नोत्तर आणि चर्चांचा संक्षिप्त आढावा**

- तारांकित प्रश्न:

प्राप्त प्रश्न: ६९३७
स्वीकृत प्रश्न: ४९१
उत्तरित प्रश्न: ७६

- **अल्पसूचना प्रश्न:**

प्राप्त: १४
अस्वीकृत: १३
संमिलित: १

- लक्षवेधी सूचना:

प्राप्त: २५५७
स्वीकृत: ४४२
चर्चा झालेल्या: १२९

- नियम ९७ अन्वये सूचना:

प्राप्त: ६०
मान्य: निरंक
चर्चा: निरंक

- शासकीय विधेयके:

प्रस्तापित: ९
संमत: ९
विधान परिषद संमत: ३

- अशासकीय विधेयके:

प्राप्त सूचना: ४२
मान्य: २२
प्रस्तापित: २२
विचारात घेतलेली: निरंक
संमत: निरंक

- शासकीय ठराव:

प्राप्त सूचना: २
मान्य: २
चर्चा झाल्या: २

- नियम २९३ अन्वये प्रस्ताव:

प्राप्त: ५
मान्य: ५
चर्चा: ५

- अर्धा तास चर्चा:

प्राप्त सूचना: ५४
स्वीकृत: ४२
चर्चा झाल्या: ३

- सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवरील चर्चा:

प्राप्त सूचना: २०९
मान्य: ४८
चर्चा झाल्या: ३

- अशासकीय ठराव:

प्राप्त: १५१
मान्य: ९४
चर्चा झाल्या: २

- अभिनंदन प्रस्ताव: ४

राजकीय संघर्ष आणि चर्चेची मर्यादा

या अधिवेशनात राजकीय संघर्ष आणि आरोप-प्रत्यारोपांचे प्रमाण अधिक होते. संविधानाच्या अमृतमहोत्सवाच्या चर्चेतही विरोधक आणि सत्ताधारी एकमेकांवर आरोप करताना दिसले.

अधिवेशनात काही महत्त्वाची विधेयके संमत झाली असली, तरी लाडक्या बहिणींच्या अनुदानवाढीसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सरकार ठोस निर्णय घेऊ शकले नाही.

आता ३० जून २०२५ पासून सुरू होणाऱ्या पुढील अधिवेशनात कोणते महत्त्वाचे निर्णय घेतले जातात, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

# मध्यवर्ती कारागृहात ‘जीवन गाणे गातच जावे’



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह येथे सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) मध्य विभाग, यांच्या सहकार्याने कारागृहातील बंद्यांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत व्हावे व त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा ते कारागृहात मुक्त झाल्यावर समाजाच्या मुख्य प्रवाहात यावे या करीता मंगळवार दि.२५ ‘जीवन गाणे गातच जावे’ या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विविध लोककला, भारुड, देशभक्तीपर गीत, नृत्य या सारख्या विविध कलांचा समावेश होता. या आयोजनात अधीक्षक मध्यवर्ती कारागृह दत्तात्रय गावडे, वरिष्ठ तुरंगाधिकारी प्रदीप रणदिवे तसेच कार्यक्रमाचे समन्वयक अनिल घोगरे तसेच त्यांचा म्युझिकल ग्रुप आणि मोठ्या संख्येने बंदीजन अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले.

# सीबीआयची देशभरात ६० ठिकाणी छापेमारी;महादेव बेटिंग ऍप प्रकरणी कारवाईचा बडगा

नवी दिल्ली : महादेव बेटिंग ऍपशी संबंधित एका प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) आज, बुधवारी छत्तीसगड, भोपाळ, कोलकाता आणि दिल्ली येथील ६० ठिकाणी छापे टाकले. या बेकायदेशीर कारभारात सहभागी असल्याचा संशय असलेल्या राजकारणी, वरिष्ठ नोकरशहा, पोलिस अधिकारी, महादेव बुकचे प्रमुख अधिकारी आणि इतर खाजगी व्यक्तींच्या घरांवर हे छापे टाकण्यात आले.

महादेव बुक हा रवी उप्पल आणि सौरभ चंद्राकर यांनी प्रमोट केलेले एक ऑनलाइन बेटिंग प्लॅटफॉर्म आहे, रवी आणि सौरभ दोघेही सध्या दुबईमध्ये आहेत. सीबीआयच्या म्हणण्यानुसार, तपासात असे दिसून आले आहे की या प्रवर्तकांनी त्यांचे बेकायदेशीर नेटवर्क सुरळीत चालावे यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांना ङ्गसंरक्षण शुल्क म्हणून मोठ्या प्रमाणात पैसे दिले होते.

महादेव ऍपचे प्रवर्तक सौरभ चंद्राकर यांना इंटरपोलने रेड कॉर्नर नोटीस जारी केल्यानंतर नोव्हेंबर २०२४ मध्ये दुबईतून अटक करण्यात आली. अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) विनंतीवरून ही नोटीस जारी करण्यात आली आहे. सीबीआयने सांगितले की, या प्रकरणाच्या तपासादरम्यान महत्त्वाचे डिजिटल आणि कागदोपत्री पुरावे जप्त करण्यात आले आहेत, जे जप्त करण्यात आले आहेत.हा गुन्हा प्रथम आर्थिक गुन्हे शाखेने रायपूरमध्ये दाखल केला होता परंतु नंतर छत्तीसगड सरकारने सखोल चौकशीसाठी हा खटला सीबीआयकडे सोपवला. सीबीआय आता या प्रकरणात वरिष्ठ सरकारी अधिकारी आणि इतर आरोपींच्या भूमिकेची चौकशी करत आहे.

सीबीआयने आज, बुधवारी सकाळी छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते भूपेश बघेल यांच्या घरांवरही छापे टाकले. महादेव बेटिंग ऍपशी संबंधित एका प्रकरणात ही छापा टाकण्यात आला आहे. भूपेश बघेल आज दिल्लीला रवाना होणार होते, जिथे ते काँग्रेसच्या अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या ‘मसुदा समिती’च्या बैठकीला उपस्थित राहणार होते. पण त्याआधीच सीबीआय त्यांच्या रायपूर आणि भिलाई येथील निवासस्थानी पोहोचले.

# बस चालवत मोबाईलवर मॅच बघणाऱ्या चालकाला एसटीने केले बडतर्फ!

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यभरात बस अपघाताच्या घटनांमध्ये वाढ होत चालली आहे. हे प्रकार रोखण्यासाठी प्रशासन पाऊल उचलत आहे. अशातच आता बस चालवत मोबाईलवर क्रिकेट मॅच बघणाऱ्या खासगी चालकाची व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. या संदर्भात एसटी प्रशासनाने बडतर्फ केले असून संबंधित खाजगी कंपनीला दंड ठोठावला आहे.

मात्र या प्रकारामुळे प्रवाशांचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. २१ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता दादर येथून स्वारगेट (पुणे) साठी निघालेल्या खाजगी ई-शिवनेरी बसमधील चालक रात्री लोणावळा जवळ बस चालवत क्रिकेट मॅच पाहत असलेले चित्रीकरण संबंधित बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी परिवहन मंत्री श्री प्रताप सरनाईक यांना पाठवले. याबाबत मंत्री सरनाईक यांनी तातडीने एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना नियमानुसार कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार एसटीच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी संबंधित खाजगी संस्थेच्या चालकास प्रवाशांचा जीव धोक्यात घालून बेशिस्त वाहनं चालवल्या प्रकरणी बडतर्फ केले असून संबंधित खाजगी संस्थेला ५०००/- इतका दंड ठोठावला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार एसटी महामंडळाने ही कारवाई केली आहे.

यावेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले की ई-शिवनेरी ही एसटीची मुंबई -पुणे मार्गावर धावणारी प्रतिष्ठित बस सेवा आहे. या बसमधून अनेक सन्माननीय व्यक्ती प्रवास करीत असतात. अपघातविरहित सेवा हा या बस सेवेचा नावलौकिक आहे. त्यामुळे अशा प्रकारे बेशिस्त वाहन चालवून प्रवाशांचा जीव धोक्यात घालणाऱ्या चालकांच्यावर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

त्यामुळे प्रवाशांचा एसटीच्या या प्रतिष्ठित सेवेबद्दल विश्वास दृढ होत जाईल! तसेच भविष्यात एसटीकडे असलेल्या खाजगी बसच्या चालकांना संबंधित संस्थेकडून वेळोवेळी शिस्तबद्ध वाहन चालवण्याचे प्रशिक्षण दिले जाण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816